

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 17 जुलै 2024 | पान- 1


# अजित गव्हाणेंनी फुंकली 'बंडाची तुतारी'

## राहुल भोसले, पंकज भालेकर, यश साने यांचाही राजीनामा : येत्या 20 तारखेला राष्ट्रवादी शरद पवार पक्षात प्रवेश करणार!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा दिला. तसेच, त्यांचे समर्थक राहुल भोसले यांनी कार्याध्यक्षपदाचा, पंकज भालेकर यांनी विधानसभा प्रमुख पदाचा आणि यश साने यांनी विद्यार्थी सेल शहराध्यपदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वर्तुळात खळबळ उडाली आहे.

येत्या २० जुलै रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांचा पिंपरी-चिंचवडमध्ये विजयी संकल्प मेळावा होणार आहे. त्यामध्ये अजित पवार गटाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासह ४० जण प्रवेश करतील, अशी चर्चा होती. मध्यंतरी गव्हाणे यांनी पवार साहेबांची भेटही घेतली होती.

लोकसभा निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाला मोठे यश मिळाले. एकूण १० पैकी ८ जागांवर पक्षाच्या उमेदवारांचा विजय झाला. तसेच, महाविकास आघाडीला महायुतीच्या तुलनेत घवघवीत यश मिळाल्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने अजित गव्हाणे यांनी 'तुतारी' हातात घेतली आहे, असा दावा केला जातो. महाविकास आघाडीकडून गव्हाणे यांचा दावा निश्चित झाल्यास, शिवसेना ठाकरे गटाकडून इच्छुक असलेले सुलभा उबाळे, धनंजय आल्हाट यांना उमेदवारीवर पाणी सोडावे लागण्याची शक्यता आहे.


पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्याकडे गव्हाणे यांनी राजीनामा पाठवला आहे. तसेच, पंकज भालेकर, राहुल भोसले आणि यश साने यांनीही बंड केल्यामुळे पिंपरी-चिंचवडमध्ये अजित पवार गटाला मोठा धक्का मानला जात आहे.




### राष्ट्रवादीचा नवा शहराध्यक्ष योगेश बहल?

» दरम्यान, अजित गव्हाणे पक्षाला रामराम ठोकणार हे निश्चित झाल्यानंतर आता अजित पवार शहरातील पक्षाची संघटनात्मक धुरा कोणाच्या खांद्यावर देणार? याकडे कार्यकर्त्यांचे लक्ष लागले होते. त्यामुळे स्थानिक नेते, गावकी-भावकी यांना शह देण्याची क्षमता असलेले माजी महापौर योगेश बहल यांना पुन्हा संघटनात्मक प्रमुख पदाची जबाबदारी सोपवण्यात येईल. तसेच, विधान परिषदेच्या राज्यपाल नियुक्त १२ जागांमध्ये राष्ट्रवादीला महायुतीमध्ये ३ जागा मिळतील. त्यामध्ये विधान परिषदेवर योगेश बहल यांना संधी देण्यात येईल, असे समजते. शहराध्यक्ष, नगरसेवक, महापौर, सत्तारुढ पक्षनेता, विरोधी पक्षनेता असा दीघ अनुभव असलेले योगेश बहल राष्ट्रवादीसाठी आता 'संकटमोचक' म्हणून पुढे येण्याची दाट शक्यता आहे.

> राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचा विजयी संकल्प मेळावा दि. २० जुलै रोजी होणार आहे. साहेबांच्या नेतृत्त्वावर विश्वास असलेले अनेकजण प्रवेश करतील. आगामी विधानसभा निवडणुकीत शहरातील तीनपैकी दोन मतदार संघामध्ये पक्षाकडून सक्षम उमेदवार आहेत. महाविकास आघाडीचे उमेदवार तीनही मतदार संघात विजय खेचून आणतील, असा आम्हाला विश्वास आहे.
>
> - तुषार कामठे, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी शरद पवार पक्ष.





# भावूक आणि जल्लोषपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी अनुभवला 'चंदू चॅम्पियन'

## पॅराऑलिंपिक सुवर्णपदक विजेते पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांचा संघर्षमयी जीवनप्रवास रेखाटणारा प्रेरणादायी चित्रपट

**पिंपरी | प्रतिनिधी**

अजाणत्या वयात नकळतपणे ठरवलेले एक स्वप्न....ते पूर्ण करण्यासाठी ध्येयवेडा झालेले ते... परंतु, एका दुर्घटनेमुळे त्यांना आलेले अपंगत्व......त्यामुळे त्यांच्या पदरी पडलेली हतबलता... निराशेच्या गर्देतून उठून पुन्हा जिद्दीने त्यांनी केलेला ध्येयाचा पाठलाग.... देशाप्रती असणारे उच्च कोटीचे प्रेम..... आपले कर्तृत्व आत्मविश्वासाने सिद्ध करत देशाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर सुवर्णाक्षरांनी कोरणारे ध्येयवेडे प्रेरणादायी कथानक..... अधूनमधून टाळ्यांचा कडकडाट.....विद्यार्थ्यांचा जल्लोष..... काही क्षण शांतता.....डोळ्यांत पाणी... आणि अंगावर शहारे...अशा भावूक आणि जल्लोषपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी अनुभवला 'चंदू चॅम्पियन' चित्रपटाचा प्रेरणादायी थरार........



नैराश्यातून बाहेर पडून नव्या उमेदीने जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहण्याचा संदेश देणारे पॅराऑलिंपिक सुवर्णपदक विजेते पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांचा संघर्षमयी जीवनप्रवास रेखाटणारा 'चंदू चॅम्पियन' हा प्रेरणादायी चित्रपट महापालिकेच्या क्रीडा प्रबोधिनीच्या विद्यार्थ्यांसह महापालिका शाळांतील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला.

यावेळी पॅराऑलिंपिक सुवर्ण पदक विजेते पद्मश्री मुरलीकांत पेटकर, महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, मुख्याध्यापक बाबासाहेब राठोड, आदिनाथ कराड, शंकर केदार, राजू कोंढवळे, नम्रता बांदल, प्रदीप जाधव, जयराम वायळ, बुधा नाडेकर, पांडुरंग मुदगुन यांच्यासह शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांनी आपल्या देशाचे नाव एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवलं आहे अशा प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्वाच्या जीवनावर आधारित असलेल्या चित्रपटातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी आणि आयुष्यात कधीही हार न मानता जिद्दीने आपले ध्येय गाठावे. हा चित्रपट पाहताना प्रत्यक्ष पद्मश्री पेटकर तुमच्यासमवेत आहेत यासाठी तुम्ही खूप नशीबवान आहात.
>
> - शेखर सिंह, आयुक्त- पिंपरी चिंचवड महापालिका

# पालिकेचा अतिक्रमण कारवाई आराखडा फुटला

## कारवाई करताना गुप्तता आवश्यक असतानाही क्षेत्रीय कार्यालयानुसार तयार केलेल्या आराखड्याला फुटले पाय

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरातील प्रत्येक ठिकाणी अतिक्रमणाचा सामना शहरातील नागरिकांना करावा लागत आहे. शहरातील मध्यवर्ती पेठांसह, बाजार पेठेशिवाय इतर रस्त्यांवर अतिक्रमणे वाढली आहेत. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून जाताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. त्यावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे महापालिका प्रशासनाला राजकीय दबावाला बळी न पडता थेट कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानंतर महापालिकेने शहरातील पाच झोनमध्ये अतिक्रमण कारवाईच्या नियोजनाचा आराखडा तयार केला आहे. मात्र त्यालाही पाय फुटल्याने आता खरच कारवाई पारदर्शकपणे पार पडणार की नेहमीप्रमाणे कारवाईपूर्वीच माहिती दिली जाणार, असा प्रश्न या निमित्ताने पुणेकरांनी उपस्थित केला आहे.

लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यानंतर पुणे महापालिका कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे कामे देण्यात आली होती. अतिक्रमण विभागाचे अनेक कर्मचारी मिळकतकर वसुलीसाठीच्या कामात गुंतले होते. कर्मचाऱ्यांअभावी अतिक्रमण विभागाकडून शहरात होणारी कारवाई थंडावली होती. याचा फायदा घेत मुख्य शहरातील रस्त्यांसह उपनगर भागातील रस्त्यांवर अतिक्रमण वाढले आहे. यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. राजकीय दबावामुळे अतिक्रमण कारवाईकडे दुर्लक्ष केले जात होते. अतिक्रमण वाढत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. रस्ते अरुंद होत असल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी केली जात होती. त्याचीच दखल घेत महापालिकेने कारवाईचे नियोजन केले असून शहरातील पाच झोनमध्ये २३ जुलै पर्यंत कारवाई केली जाणार आहे.



### अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारीच देतात टीप

» महापालिकेने साहाय्यक निरीक्षकांची भरतीनंतर केल्यानंतर कारवाईला वेग येऊन शहर अतिक्रमणमुक्त होईल, अशी आशा पुणेकरांना होती. परंतु महापालिकेत अतिक्रमण निरीक्षक, साहाय्यक निरीक्षक एकाच भागात अनेक वर्षांपासून काम करत असल्याने अतिक्रमण करणाऱ्यांना माहिती पोहोचवली जात होती. त्यामुळे पुन्हा अतिक्रमण होत होते. शहरात अशाच अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने रस्त्यावर अतिक्रमणे वाढत आहेत. कारवाई करण्यासाठी अतिक्रमण पथक निघताच कारवाईची माहिती स्टॉलधारक, हातगाडी, पथारी व्यावसायिकांना मिळते. दुकानदार त्यांचे दुकानाबाहेरील साहित्य आतमध्ये घेतात. त्यामुळे अवघ्या ५-१० मिनिटांत रस्त्यावरील अनधिकृत व्यावसायिक गायब होतात. अतिक्रमण पथकाची गाडी निघून गेल्यानंतर परत रस्ता अतिक्रमणांनी गजबजून जातो. अतिक्रमणविरोधी पथकातील कर्मचारीच ही टीप देत असल्याने महापालिका केवळ दिखाऊ कारवाई करते. त्यामुळे अतिक्रमणाचे पेव फुटले आहे.

### थकीत भाडे लवकर भरा अन्यथा कारवाई

» अटी शर्तीचा भंग करू नये. थकीत भाडे लवकरात लवकर भरावे. अन्यथा परवाने रद्द करण्यात येथील, असा इशारा परवानाधारक व्यावसायिकांना अतिक्रमण विभागाने दिला आहे. तसेच परवानाधारक व्यावसायिकांचा माल खरेदी करताना शहानिशा करून संबंधित परवानाधारकांकडूनच माल साहित्य खरेदी करावे जेणेकरून अनधिकृत व्यावसायिकांना मज्जाव होण्यास सहकार्य मिळेल, असे आवाहन अतिक्रमण विभागाने नागरिकांना केले आहे.

### या भागात केली अतिक्रमण विरोधी कारवाई

» हडपसर भागातील भैरोबा नाला ते रविदर्शन, पुणे सोलापूर रस्त्यावर बांधकाम विकास विभागाकडून एकूण २६,००० चौरस फूट फ्रंट मार्जिनमधील कच्चे पक्के बांधकाम शेड हटविण्यात आले. अतिक्रमण विभागाकडून अटी शर्तीचा भंग करणारे, थकीत परवाना भाडे असणारे व अनधिकृत व्यावसायिकांवर अतिक्रमण निर्मूलनाची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत फ्रंट मार्जिन मधील कारवाई प्राधान्य क्रम देण्यात आला आहे. या कारवाईत २ हातगाडी, २१ भाजी / फळ पथाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

# सावधान..! तुमच्यावर स्मार्ट सीसीटीव्हींची राहील नजर!

## शहरात असे आधुनिक कॅमेरे व इतर आधुनिक संरक्षण यंत्रणा बसवण्यासाठी शासनाकडून 435 कोटींचा निधी मंजूर झाला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात असे आधुनिक कॅमेरे व इतर आधुनिक संरक्षण यंत्रणा बसवण्यासाठी शासनाकडून ४३५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. शहरात यापूर्वी बसविण्यात आलेले १३०० कॅमेरे आणि नवीन मंजूर झालेले दोन हजार ८८६ कॅमेरे अशा सर्व कॅमेऱ्यांना एआय बेस कॅमेऱ्यांमध्ये अपग्रेड केले जाणार आहे.

या माध्यमातून शहर, राज्यासह देशभरात वॉन्टेड असलेल्या आरोपींना ओळखणे शक्य होणार आहे. काळानुरूप गुन्हेगार देखील हायटेक झाल्याने पोलिसांसमोर आव्हान निर्माण होत आहे. तर, अनेकदा एका शहरात गुन्हा करून आरोपी दुसऱ्या शहरात वास्तव्य करतो. मात्र, असे गुन्हेगार शहरात आले, तरी त्यांचा थांगपत्ता लागत नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर आता पुणे पोलिसांकडून देखील अत्याधुनिक यंत्रणेच्या माध्यमातून आरोपींना पकडण्यासाठी कसोशीने प्रयत्न केले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून आता फेस रेकग्नायझेशन यंत्रणा कार्यान्वित केली जाणार आहे.

विशेषतः शहरातील गर्दीच्या ठिकाणी म्हणजेच एसटी स्टँड, रेल्वे स्थानक परिसर आदी ठिकाणी या प्रकारचे कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. या सीसीटीव्ही यंत्रणेच्या माध्यमातून आरोपींना ओळखून त्यांच्यावर कारवाई करणे शक्य होणार आहे.

पेहराव बदलला तरी शरीराच्या ठेवणीवरून हे सराईत आरोपी कॅमेऱ्यांत तत्काळ कैद होतील. त्यामुळे सराईत आरोपींची चालाखीही येथे काम करणार नसल्याचे पोलिसांनी सांगितले.



### तत्काळ कारवाई करणे शक्य

» सीसीटीव्हीच्या माध्यमातून फेस रिकग्नायझेशन सिस्टिमचे काम चालणार आहे. सीसीटीव्हीत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा चेहरा या यंत्रणेच्या माध्यमातून 'कॅप्चर' होईल. त्यानंतर पुणे पोलिसांकडे असणाऱ्या गुन्हेगारांच्या माहितीनुसार गुन्हेगार किंवा संशयित, यामध्ये आढळून आल्यास त्याची सूचना नियंत्रण कक्षाला मिळून संबंधित ठिकाणी तत्काळ कारवाई करणे शक्य होणार आहे.

### गर्दीच्या ठिकाणी बारीक नजर

» अनेकदा स्थानक परिसरात मोबाईल चोरी, पाकीटमारीच्या घटना घडतात. यासह प्रवासामध्ये गुंगीचे औषध देऊन सोन्याच्या दागिन्यांची चोरी केली जाते. प्रमुख शहरांना दहशतवादी हल्ल्याचा धोका देखील असतो. गर्दीच्या ठिकाणी अशा हालचाली होतात. अशा ठिकाणांहून गुन्हेगारांना पळ काढणे सोपे असते. परंतु, या यंत्रणेची अंमलबजावणी केल्यास हा धोका कमी होणार आहे.

# वायसीएममधील डॉक्टरांची चौकशी करावी

## पूजा खेडकरने 'वायसीएम' रुग्णालयातून अंपगत्वाचे प्रमाणपत्र घेतल्याचे उघड : आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकर यांना वाय.सी.एम रुग्णालयाने दिव्यांग सर्टिफिकेट दिल्याने वायसीएम रुग्णालयावर आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. याप्रकरणी महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनी रुग्णालयातील डॉक्टरांची चौकशी करावी अशी मागणी केली आहे.



विजय कुंभार म्हणाले, पिंपरी- चिंचवड महानगर पालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाने पूजा खेडकर यांना दिव्यांग प्रमाणपत्र दिलं. ते देत असताना अनेक उणिवा आहेत, त्रुटी आहेत. पुढे ते म्हणाले, ज्या व्यक्तीला सर्टिफिकेट द्यायचं असत. त्या व्यक्तीचा ओळखीचा पुरावा म्हणून फोटो आयडेंटिटी प्रुफ द्यावं लागतं. पूजा खेडकर यांच्याबाबत रेशनकार्ड हा पूर्व गृहीत धरला आहे. सुप्रीम कोर्टाने आधीच सांगितलं आहे. रेशनकार्ड हा पुरावा गृहीत धरला जाऊ शकत नाही. पुढे ते म्हणाले, आधीची सर्टिफिकेट ही नगरची आहेत. औंधला तिथला पत्ता दिला, तर यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी पिंपरी- चिंचवडचा पत्ता दिला. हे चुकीचं आणि बेकायदेशीर आहे. पुढे ते म्हणाले, पूजा खेडकर यांना दिव्यांग प्रमाणपत्र देण्यापूर्वी हे तपासायला हवं होतं. ते त्यांना घाईत दिलं आहे. याप्रकरणी YCM रुग्णालयाने काय केलंय? याची चौकशी महानगर पालिका आयुक्तांनी करावी. पुढे ते म्हणाले, सर्व सामान्य नागरिकाने असं केलं असतं तर बनावट दाखले बनवले म्हणून जेलमध्ये टाकलं असतं, असंही ते म्हणाले.

**वैद्यकीय महाविद्यालयासाठी कोणते प्रमाणपत्र सादर केले होते?**

२००७ मध्ये खासगी वैद्यकीय महाविद्यालयात अर्ज करताना त्यांनी अनेक प्रमाणपत्र सादर केल्याचेही समोर आले आहे. पूजा खेडकर यांनी २००७ मध्ये प्रवेश घेतला. त्यांना CET (कॉमन एंट्रन्स टेस्ट) द्वारे प्रवेश मिळाला, जिथे त्यांनी आरक्षणाचे प्रमाणपत्र दिले. त्यांनी जात प्रमाणपत्र, जात वैधता आणि नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र आणि वैद्यकीय प्रमाणपत्र देखील सादर केले. परंतु, त्यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्रात अपंगत्वाचा कोठेही उल्लेख नाही, असं काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय आणि सामान्य रुग्णालयाचे संचालक अरविंद भोरे यांनी एएनआय या वृत्तसंस्थेला सांगितले.

दरम्यान, हे प्रकरण बाहेर आल्यापासून पूजा खेडकर चर्चेत आहेत. त्यांच्यावर सर्वत्र टीका होतेय. परंतु, यातही सत्य बाहेर येईल, याची खात्री आहे, असा विश्वास पूजा खेडकर यांनी व्यक्त केला आहे. तसंच, मी दोषी असल्याचं सिद्ध करणारी मीडिया ट्रायल चुकीची आहे, असंही त्यांनी म्हटलंय.

### शासनाकडून चौकशी सुरू

» प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर यांचे अनेक वादग्रस्त प्रकार समोर येत आहेत. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये प्रशिक्षणार्थी सहायक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असताना कामकाजादरम्यान सुसज्ज स्वतंत्र कक्षाची मागणी, कक्ष उपलब्ध न झाल्याने त्यांनी वरिष्ठ महिला अधिकाऱ्यांच्या 'अँटी चेंबर'चा ताबा, आलिशान वाहनावर लाल आणि निळा दिवा लावून फिरणे आदी अनेक कारणांनी त्या चर्चेत आल्या. पुण्याचे जिल्हाधिकारी सुहास दिवसे यांनी राज्य सरकारकडे त्याचा अहवाल पाठवल्यावर पूजा खेडकर यांची वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयात बदली केली. त्यांनी यूपीएससीची परीक्षा देताना अपंगत्वाचे प्रमाणपत्र जोडले होते. त्याआधारे त्यांनी परीक्षा देत विशेष सवलत मिळवून आयएएस बनल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी शासनाकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.

# शहरातील दोन अनधिकृत शाळांवर गुन्हे दाखल

## ऑर्चिड अन् लिटील स्टार शाळांवर गुन्हे दाखल : अनधिकृतपणे शाळा चालविल्याचा ठपका

**पिंपरी | प्रतिनिधी**

शाळांवर महापालिकेने कारवाईचा बडगा उगारला आहे. चिंचवडमधील लिटील स्टार इंग्लिश मिडियम स्कूल आणि ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल या दोन अनधिकृत शाळांवर गुन्हा दाखल केला आहे. याबाबत सकाळ वारंवार पाठपुरावा केला होता. उर्वरित शाळावर गुन्हा कधी दाखल होईल, याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



पहिल्या गुन्ह्यात ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूलचे जे डीकोस्टा (रा. बंगलोर) आणि समीर गोरडे (रा. विमाननगर, पुणे) या दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. तर दुस-या गुन्ह्यामध्ये लिटील स्टार इंग्लिश मिडियम स्कूलचे श्रेयकुमार (रा. चिंचवडेनगर, चिंचवड) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही गुन्ह्यांमध्ये विलास दयाराम पाटील (वय 51, रा. नवी सांगवी) यांनी सोमवारी (दि. 15) याबाबत चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एप्रिल 2024 पासून आरोपींनी शासनाने ठरवून दिलेल्या कोणत्याही नियम व अटींची पूर्तता न करता लिटील स्टार इंग्लिश मिडियम स्कूल आणि ऑर्चिड इंटरनॅशनल स्कूल या शाळा सुरू ठेवल्या. तसेच शाळा अधिकृत असल्याचे पालकांना भासवून विद्यार्थ्यांना अनधिकृतपणे शाळेत प्रवेश देत फी वसूल केली. विद्यार्थ्यांचे दाखले व इतर शैक्षणिक कागदपत्रे ताब्यात घेऊन शासन, विद्यार्थी व पालक यांची फसवणूक केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, शहरात कित्येक वर्षांपासून अनधिकृत शाळांनी शिक्षणाचा बाजार मांडला आहे. शाळा हे कमी वेळेत मुबलक पैसा कमविण्याचे साधन बनले आहे. समाजातील विविध क्षेत्रातील लोकांनी मराठी, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा सपाटा लावला आहे. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाठ शुल्क वसुलीही करतात. परंतु; आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत.

**अनधिकृत आढळलेल्या इतर शाळा पुढीलप्रमाणे -**

माउंट एव्हरेस्ट एज्युकेशनल ट्रस्ट, गांधीनगर-पिंपळे निलख; चैतन्य इंग्लिश मीडियम स्कूल, विशालनगर-पिंपळे निलख; आयडियल इंग्लिश स्कूल, जवळकरनगर-पिंपळे गुरव; रोपटे इंग्लिश मीडियम स्कूल, मोशी; नवजित विद्यालय, लक्ष्मीनगर-वाल्हेकरवाडी; मुलांची शाळा, पिंपळे सौदागर; एम एस स्कूल फॉर किड्स, सांगवी; क्रिस्टल मॉडर्न स्कूल, वाळमुकवाडी.

### शहरात 11 अनधिकृत शाळा

» पिंपरी चिंचवड शहरातील शाळांची तपासणी केली असता त्यामध्ये 11 शाळा अनधिकृत असल्याचे दिसून आले. यामध्ये काही राजकीय नेत्यांच्याही शाळांचा समावेश आहे. या शाळांवर कारवाई होणार का, अशी चर्चा शहरात सुरू होती. मात्र शिक्षण विभागाने आता कारवाईचा बडगा उगारला आहे.

# पुण्यात झिका व्हायरसचा प्रादुर्भाव वाढला

**राज्यभरात झिकाचा धोका वाढला असून, झिकाची रुग्णसंख्या ही 25 वर पोहोचली, तर झिकाचे सर्वाधिक म्हणजे 23 रुग्ण पुण्यात आढळून आले आहेत**



**पुणे | प्रतिनिधी**

शहरात झिका व्हायरससह डेंग्यूच्या धोक्यात वाढ झाल्याचं दिसून येत आहे. पावसामुळे डांसाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, तर गेल्या काही दिवसांमध्ये झिका व्हायरससह डेंग्यूच्या रूग्णांची वाढती संख्या डोकेदुखी ठरत आहे. तर राज्यभरात झिकाचा धोका वाढला असून, झिकाची रुग्णसंख्या ही २५ वर पोहोचली आहे. तर झिकाचे सर्वाधिक म्हणजे २३ रुग्ण पुण्यात आढळून आले आहेत, पुण्यापाठोपाठ कोल्हापूर आणि संगमनेरमध्येही प्रत्येकी एक रुग्ण आढळून आला आहे. झिका व्हायरसचा धोका गर्भवती माता आणि तिच्या गर्भाला जास्त असल्यामुळे त्यांच्या तपासणीसाठी आरोग्य विभागाने भर दिला आहे. झिकाच्या एकूण रुग्णांपैकी सर्वाधिक प्रमाण हे गर्भवती मातांचे आहे.

झिका व्हायरससह शहरात डेंग्यूच्या रुग्णसंख्येतील मोठी वाढ दिसून येत आहे. या जुलै महिन्यात डेंग्यूचे एकूण २१६ संशयित रुग्ण आढळले असून, त्यातील १५६ रुग्ण हे या आठवडाभरातील आहेत. त्यामुळे पालिकेच्या आरोग्य विभागाकडून डासोत्पत्ती जागा शोधून त्या नष्ट करण्याचे काम सुरू आहे. डेंग्यूच्या रुग्णांची संख्या वाढू लागली आहे. या पार्श्वभूमीवर काळजी घेण्याचा सल्ला आरोग्यतज्ज्ञांनी नागरिकांना दिला आहे.

### शहरात या महिन्यात डेंग्यूचे २१६ संशयित रुग्ण

पुणे शहरात जुलै महिन्यामध्ये डेंग्यूचे २१६ संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील ५ रूग्णाचे डेंग्यूचे निदान झाले आहे. गेल्या महिन्यात संशयित रुग्णांची संख्या १५७ होती तर निदान झालेला केवळ १ रुग्ण होता. जानेवारी २०२४ ते मे २०२४ या काळात दर महिन्याला संशयित रुग्णांची संख्या १०० पेक्षा कमी होती. जानेवारी महिन्यामध्ये ९६, फेब्रुवारी महिन्यामध्ये ७५, मार्च महिन्यामध्ये ६४, एप्रिल महिन्यामध्ये ५१ आणि मे महिन्यामध्ये ४४ अशी रुग्णसंख्या होती.

त्यानंतर आता पावसाळा सुरू झाल्याने जून महिन्यापासून डेंग्यूच्या रुग्णसंख्येत मोठी वाढ झालेली आहे. शहरात या वर्षभरात डेंग्यूचे ७०३ संशयित रुग्ण आढळले असून, तर निदान झालेले १५ रुग्ण आहेत. तर शहरात चिकुनगुनियाचे १५ रुग्ण आढळून आले आहेत. फेब्रुवारी महिन्यामध्ये ५, मार्च महिन्यामध्ये ४, एप्रिल महिन्यामध्ये २ आणि आता जुलैमध्ये ५ रुग्ण आहेत. दिलासादायक बाब म्हणजे शहरात यंदा एकही रुग्ण हिवतापाचा आढळून आलेला नसल्याची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अहवालातून समोर आली आहे.

### पुणे शहरातील झिकाची रुग्णसंख्या 21 वर

» पुण्यामध्ये जून महिन्यात झिका व्हायरसचा पहिला रूग्ण आढळला होता. त्यानंतर आता पुणे शहरातील झिकाची व्हायरसच्या रुग्णांची संख्या २१ वर पोहोचली असून, त्यामध्ये १० गर्भवती मातांचा समावेश आहेत. पुणे जिल्ह्यातील सासवड, मुळशीतील भूगाव या ठिकाणी झिकाची व्हायरसचा प्रत्येकी एक-एक रुग्ण आढळून आला आहे. झिका व्हायरसचा सर्वाधिक धोका गर्भवती मातेला आणि तिच्या गर्भाला असतो. त्यामुळे गर्भवती मातांच्या चाचण्या आणि तपासणीवर पालिकेकडून भर दिला जात आहे.

# जमीन मोजणीतील वशिलेबाजीला लगाम

**जमीन मोजणीच्या प्रक्रियेमधील मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी भूमि अभिलेख विभागाने 'ई मोजणी 2.0' ही नवीन संगणक प्रणाली**



**पुणे | प्रतिनिधी**

जमीन मोजणीच्या प्रक्रियेमधील मानवी हस्तक्षेप टाळण्यासाठी भूमि अभिलेख विभागाने "ई मोजणी 2.0" ही नवीन संगणक प्रणाली आणली आहे. यामध्ये प्रामुख्याने जमीन मोजणीचा अर्ज ज्या क्रमाने येणार, त्याच क्रमाने मोजणी केली जाणार आहे.

मोजणीवेळी उपस्थित असणारे भूकरमापक, लगतचे शेतकरी, जागामालक यांचे छायाचित्रही अपलोड करावे लागणार आहे. तसेच मोजणी नकाशावर अक्षांक्ष व रेखांशही (कोर्डिनेट्स) समाविष्ट असतील. या सर्व प्रक्रियेमुळे जमीन मोजणीमध्ये पारदर्शकता येणार असून वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

मोजणीवेळी उपस्थित असणारे भूकरमापक, लगतचे शेतकरी, जागामालक यांचे छायाचित्रही अपलोड करावे लागणार आहे. तसेच मोजणी नकाशावर अक्षांक्ष व रेखांशही (कोर्डिनेट्स) समाविष्ट असतील. या सर्व प्रक्रियेमुळे जमीन मोजणीमध्ये पारदर्शकता येणार असून वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

मोजणीवेळी उपस्थित असणारे भूकरमापक, लगतचे शेतकरी, जागामालक यांचे छायाचित्रही अपलोड करावे लागणार आहे. तसेच मोजणी नकाशावर अक्षांक्ष व रेखांशही (कोर्डिनेट्स) समाविष्ट असतील. या सर्व प्रक्रियेमुळे जमीन मोजणीमध्ये पारदर्शकता येणार असून वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

मोजणीवेळी उपस्थित असणारे भूकरमापक, लगतचे शेतकरी, जागामालक यांचे छायाचित्रही अपलोड करावे लागणार आहे. तसेच मोजणी नकाशावर अक्षांक्ष व रेखांशही (कोर्डिनेट्स) समाविष्ट असतील. या सर्व प्रक्रियेमुळे जमीन मोजणीमध्ये पारदर्शकता येणार असून वशिलेबाजीला लगाम बसणार आहे.

### प्रथम ग्रेणाऱ्यास प्रथम प्राधान्य

मोजणीसाठी ऑनलाइन अर्ज केला तरी, त्याची प्रिंट काढून उप अधीक्षक कार्यालयात जमा करावा लागते. त्यावेळी मोजणीसाठीची तारीख दिली जाते. मोजणीसाठी बऱ्याच वेळा वशिलेबाजीने मोजणीची तारीख लवकर दिली जाते.

त्यामुळे प्रामाणिकपणे मोजणीसाठी वाट पाहणाऱ्यांवर अन्याय होतो. या पार्श्वभूमीवर ई मोजणी 2.0 मध्ये “फिफो’ अर्थात (फस्ट इन फस्ट आऊट ) प्रथम ग्रेणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वानुसार मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहे.

### घरबसल्या मिळणार “क’ प्रत

» मोजणी झाल्यानंतर अर्जदारांना मोजणी नकाशाच्या “क’ प्रती पुरविल्या जातात. या मोजणी नकाशाच्या “क’ प्रतीमध्ये जागेवर प्रत्यक्ष मोजणी वेळी वहिवाटी अथवा ताब्याप्रमाणे अभिलेखाप्रमाणे येणाऱ्या हद्दी दर्शवून योग्य परिमाणात संबधित टिपा नमूद मोजणी नकाशाची “क’ प्रत पुरविली जाते. या प्रणालीनुसार जमीन मोजणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जमिन मोजणीचा नकाशा अर्थात “क’ प्रत ही ऑनलाइन पद्धतीने डिजिटल स्वाक्षरीत अर्जदाराला मिळणार आहे.